# वनसंवर्धन कायदा १९८० मार्गदर्शक तत्वे

वनसंवर्धन कायदा २५ ऑक्टोबर १९८० ला संसदेने पारित केला, काश्मिर सोडून पुर्ण देशात लागु झाले.

➔ **वनेत्तर काम म्हणजे काय, खालील कामासाठी वनजमिनीवर उभे असलेले झाड कापणे व खोदकाम करणे :**

अ) चहा, कॉफी, मसाले, रबर, पाम, तेलीय वनस्पती, फळझाडे व औषधी वनस्पती इ. ची लागवड करणे या व्यतिरिक्त वनीकरण शिवाय इतर कामे जर करावयाचे असेल तर,

०१. वनिकरण, जर नैसर्गिक वनांना कापून करावयाचे असेल तर परवानगी लागेल,

०२. खाजगी संस्थाना वनीकरणासाठी लिजवर देण्यासाठी देखील परवानगी घ्यावी लागेल,

०३. वनविभागाला सुध्दा वनात कामे करण्यासाठी परवानगी घ्यावी लागते,

ब) पुनर्वनिकरण सोडून इतर काहीही काम करणे.

➔ **कोणकोणते काम वनेत्तर नाही.**

वनाचे व वन्यप्रांण्याचे संरक्षण व संवर्धनासाठी व्यवस्थापन व विकासासाठी सर्व काम, जसे चेक पोष्ट, फायरलाईन्स, वायरलेस, फेन्सींग, पुल, कल्व्हर्ट, डॅम, वॉटरहोल, ट्रेन्च माऊन्ड, पाईप लाईन इ.

➔ **केन्द्र शासन सल्लागार समितीची नेमणुक करून कलम -२ खाली परवानगी देते.**

०१ **दंड व शिक्षा** : जो कोणी वनकायदा भंग (कलम-२) करेल आणि जो कोणी त्याला सहाय्यता करत असेल, त्यांना १५ दिवसापुर्वी साधारण जेलच्या सजेचे प्रावधान आहे.

०२. **विशेष तरतुद** : शासकीय विभागात - विभाग प्रमुख व प्रकरणाशी संबंधित असणारे यांचेवर आरोप लावुन, कार्यवाही होवू शकते, तथापि जर विभाग प्रमुख किंवा प्राधिकरण हे सिध्द करू शकत असतील की, वन भंगाबाबत त्यांना जाणीव नव्हती आणि त्यांनी वन भंग न होवू देणे विषयी पुर्ण काळजी घेतली होतीअशा स्थितीत त्यांचेवर ज्यांच्या चुकामुळे वनभंग झालेला आहे त्यांचेवर कार्यवाही करता येते.

०३. केन्द्र शासन यावर गॅझेट नोटीफिकेशन व्दारे नविन नियम जारी करू शकते आणि त्याला संसदेची मंजुरी लागते

➔ **वन या शब्द रचनेत कोणकोणत्या प्रकारचे वन येतात.**

राखीव वन, संरक्षित वन, शासकीय अभिलेख्यात वन म्हणुन नोंद असणारे क्षेत्र, कि क्षेत्र ज्याला कलम -४ ची नोटीस लागली आहे, वनसदृश्य वने / (१२-१२-१९९६ मध्ये रिट याचिका २०२/९५), तसेच महाराष्ट्र ३५ सेक्सन लागलेले वने, शेतकऱ्यांना देण्यात आलेले क्षेत्र (कलम -२२ अंतर्गत आणि कलम - ६ अंतर्गत १९८० नंतरचे) अशा वनाचा समावेश होतो.

➔ **खाजगी क्षेत्रात केलेले किंवा लावलेले रोपवने वन समजायचे काय.**

नाही (पान क्रमांक १९, भाग-सी १.१(i)) केन्द्र शासनाचे मार्गदर्शन पुस्तिकाप्रमाणे.

➔ **वनसंवर्धन कायद्यातंर्गत गुन्हा केव्हा दाखल करावयाचा.**

०१. फक्त त्याचवेळी जेव्हा राज्यशासन किंवा कोणी प्राधिकरण कलम-२ अंतर्गत केन्द्र शासनाचे अनुमती शिवाय प्रकल्प यंत्रणाना कामे करण्याची परवानगी देते.

०२. शक्यतो -अवैध वृक्षतोड,अवैध वाहतुक, अतिक्रमण इ. भारतीय वनअधिनियम १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२, राज्य वन अधिनियम, एन्व्हायरमेन्ट प्रोटेक्शन अधिनियम अंतर्गत गुन्हेकाम नोंद केले पाहिजे.

➔ **वन कायद्याचा भंग झाल्यावर कोणती कार्यवाही करणे आवश्यक आहे.**

०१. त्वरीत आपले वरिष्ठांना लेखी कळवावयाचे.

०२. काम बंद करावयाचे.



Scanned by CamScanner

०३. हॅन्ड बुकचे पान क्रमांक २२, परिच्छेद १.९ नुसार वनभंगाबाबत स्वंयस्पष्ट अहवाल सर्व आवश्यक कागदपत्रासह, भंग करणारे अधिकाऱ्यांचे नांव / हुद्दा, इ. उपवनसंरक्षक यांनी आपले मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक मार्फत मुख्य वनसंरक्षक व केन्द्रस्थ अधिकारी यांना इंग्रजीत सादर करावयाचे.

०४. त्यानंतर येथुन हे प्रकरण मुख्य वनसंरक्षक (केन्द्रीय) भोपाळ येथे पाठविले जाईल.

०५. राज्य शासनाचे १९९१ मध्ये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली स्थापित केलेल्या समितीपुढे विहीत उपयन्नात व विहित प्रतित उपवनसंरक्षक / वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक यांनी आपले कार्यालयातर्फे त्वरीत पाठवावयाचे

➔ या अधिनियमातंर्गत स्थानिक कर्मचारी न्यायालयात प्रकरण दाखल करु शकतो काय.

नाही, मार्गदर्शक सुचनांचे पृष्ठ क्रमांक ५, परिच्छेद क्रमांक ४ प्रमाणे खटला दाखल करण्याचे अधिकार फक्त मुख्य वनसंरक्षक (केन्द्रीय) भोपाळ यांना देण्यात आलेले आहे. तथापी न्यायालयात प्रकरण दाखल करण्यापुर्वी त्यांना सुध्दा त्या यंत्रणेला / अधिकाऱ्याला लेखी कारण दाखवा नोटीस देणे व ६० दिवसांची मुदत देणे क्रमप्राप्त आहे.

➔ राज्य शासनाला या अधिनियमांतर्गत काही अधिकार आहे काय.

०१. रस्त्याच्या कडेनी Existing, Row, underground pipe line टाकणेची प्रधान मुख्य वनसंरक्षक यांना परवानगी देण्याचे अधिकार आहे.

०२. पाईप लाईन, पॉवर लाईन – राज्य शासनाला परवानगी देण्याचे अधिकार आहे, तथापि

०३. जेथे झाड तोड होणार नाही आणि जमिन खाली १ मीटर रूंदीत आणि २ मिटर खाली पर्यंत काम करावयाचे असेल, काम करण्याचे १५-१०-२००५ पावेतो अधिकार आहे, ह्या सवलती संरक्षित क्षेत्रासाठी नाही.

०४. आदिवासी मध्ये स्थानिक आदिवासी यांचे घरापर्यंत जमिनीखालुन इलेक्ट्रिक लाईन, पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन, टेलीफोन लाईन, ज्यात ५० पेक्षा जास्त झाडांची तोड नाही व ज्याची खोली ६० सेंमी खाली असेल आणि ते क्षेत्र संरक्षित क्षेत्र बाहेर असले पाहिजे.

०५. सध्यास्थितीत असलेल्या रस्त्याचे काम रूंदीतच झाले पाहिजे.

०६. सध्या जर हे क्षेत्र संरक्षित क्षेत्रापासुन १० कि.मी. अंतरापर्यंत असेल तर झाडतोड आवश्यक असेल तर उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठ याची परवानगी घेणे आवश्यक आहे.

➔ वनसंवर्धन अधिनियम सर्व्हेक्षण, सिमांकनाला लागु होतो काय.

लागु होत नाही; फक्त खोदकाम व्हावयास नको, झाडतोड होणार नाही; फक्त सर्व्हेक्षणासाठी झुडपी सफाई (Lopping) करता येते, खनिजासाठी (Mineral) काही बोअरींग करता येते, ( 1.3-v(पृष्ठ क्रमांक २०)) संरक्षित क्षेत्रात अशा सर्वेक्षणास केन्द्र शासनाची मंजुरी शिवाय घेता येत नाही. (पृष्ठ क्रमांक २०,१.३(i) व (ii))

➔ खाजंगी संस्थाना वनजमिन वाटप करण्याबाबत वनसंवर्धन कायद्याची अडचण आहे काय. पृष्ठ क्रमांक ६६/६५.

केन्द्र शासनाचे दिनांक ७ जुन १९९९ चे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ७ अटीवर अशासकीय संस्था, खाजगी संस्था व वनविभाग करारनामा करू शकते. केन्द्र शासनाची सुचना क्रमांक (१.७(ii)) पृष्ठ क्रमांक १९ प्रमाणे खाजगी संस्था / व्यक्ती यांना वनक्षेत्र वनिकरणासाठी नुस्ते राज्य शासनातर्फे देता येत नाही. तरी अशाप्रसंगी केन्द्र शासनाकडुन खुलासा घेणे आवश्यक वाटते.

*अटी :*

०१. वनाची घनता ०.४ खाली असावी.

०२. अशासकीय संस्था, वनविभाग व खाजगी संस्था त्रिपक्षीय करार, वनउपजावर / वनजमिनीवर अशासकीय संस्था / संस्थाचा हक्क राहणार नाही.

०३. स्थानिकांचे हक्क / सवलती वर फरक पडणार नाही.

०४. करार ५-७ वर्षासाठी असावा.

०५. स्थानिक प्रजाती यांना प्राथमिकता देणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

➔ **Environment Clearance घेणे केंव्हा आवश्यक आहे.**

०१. पाटबंधारे मध्यम, मोठे प्रकल्प १०,००० हेक्टरपेक्षा मोठे लाभ क्षेत्र जर असेल तर

०२. माईनिंग ५ हेक्टरचे वर क्षेत्र असेल तर.

०३ रस्तो डांबरीकरण करण्यासाठी.

०४. Polluting Industry साठी.

➔ **पर्यायी वनिकरणासाठी वनेत्तर क्षेत्र निवड करतांना काय-काय अटी पुर्ण करावयाच्या आहे.**

०१. असे क्षेत्र वनांचे सलग असले पाहिजे.

०२. शक्यतो एकाच पॅचमध्ये असले पाहिजे.

०३. अतिक्रमण रहित व्यवस्थापन, संरक्षण आणि रोपवनाचे अनुषंगाने उत्कृष्ठ असले पाहिजे आणि त्या क्षेत्रावर कुठल्याच प्रकारचा बोझा नसावा.

➔ **वनसंवर्धन अधिनियमातंर्गत बांधकामावर काय प्रतिबंध आहे.**

अत्यंत आवश्यक बांधकाम जसे : चेक नाका, वनरक्षक निवासस्थान, तपासणी नाका व त्यांचे घर, रेंज कार्यालय, दोन खोल्याचे निरिक्षण कुटी इ. कामे सोडुन सर्व बांधकामावर वनसंवर्धन अधिनियम लागु होतो.

➔ **वनात तयार करणारे रस्तेबाबत वनसंवर्धन कायद्याची अट काय आहे.**

०१. राज्य शासनाचे जुन २००४ चे शासन निर्णय प्रमाणे अस्तित्वात असलेल्या रुंदीत **side drain to side drain** मध्ये खोदकाम, खडीकरण, कल्व्हर्ट, पुल इ. बांधता येते, अस्तित्वात असलेले क्षेत्र म्हणजे त्यांचे अस्तित्व भारतीय सर्व्हेक्षण विभागाव्दारे जारी केलेले टोपोशिट मध्ये समावेश असले पाहिजे.

०२. इत्तर अटी

    ०१. खडी, माती, बाहेरून आणली पाहिजे.

    ०२. साध्या याला केन्द्र शासनाची देखील मंजुरी दिली पाहिजे.

    ०३. **Cart Tract** चे स्टेटस ३.५ मीटर रूंद समजावयाचे.

    ०४. इत्तर वनात असलेल्या रस्त्यांना गाव रस्ते चा दर्जा दिला आहे आणि त्याच रुंदीत कामे करता येते.

➔ **इको टुरिझमवर वनसंवर्धन अधिनियम अंतर्गत काही सुचना आहे काय.**

०१. वनसंवर्धन कायद्यातर्गत काहीही सुचना प्राप्त नाहीत. नॅशनल वेस्ट लॅन्ड बोर्ड यांनी काही सुचना काढलेल्या आहेत, ते खालील प्रमाणे.

    ०१. सर्व नविन बांधकाम संरक्षित क्षेत्रातून बाहेर करावे.

    ०२. जुने सर्व बांधकाम संरक्षित क्षेत्रातुन बाहेर काढुन आणावयाचे.

    ०३. स्थानिक लोकांना या कामामुळे रोजगार भेटला पाहिजे.

    ०४. वनसंवर्धनावर जास्त लक्ष आणि पर्यटनावर गौण ठेवावे. तसेच सर्व पर्यटन संवर्धनाचे हितांवर लक्ष ठेवुनच करणे आवश्यक आहे.

    ०५. जलसंधारण, विद्यार्थी यांना निसर्गविषयी आपुलकी राहील अशी योजना असावी.

➔ **प्रस्ताव तयार करतांना नेहमीच्या चुका काय असतात.**

०१. एकाच प्रकारच्या चुका वारंवार होणे.

०२. पर्यायी वनिकरणाचे क्षेत्र योग्य नसणे.

०३. माहिती अर्धवट असणे, वन व वनाबाबत अपुर्ण माहिती देतात, चुकीचा सर्वे नंबर दिल्या जात आहे, एका ठिकाणची माहिती दुसऱ्या ठिकाणी दिलेल्या माहितीशी जुळत नाही

०४. ७/१२ प्रमाणपत्रावर व एरिया स्टेटमेन्ट व नकाशावर दिलेली माहिती एकमेकाशी जुळत नाही.

०५. नकाशामध्ये सुचना बरोबर दिल्या जात नाहीत

०६. बांधकाम संरचना बाबत माहिती व्यवस्थित व पुर्ण दिल्या जात नाही, क्षेत्र व सर्वे नंबर मध्ये ताळमेळ जुळत नाही.



Scanned by CamScanner

०७ काही वनविभागाकडून जिल्हा सिमांकन identified forest ची माहिती अजुनही अप्राप्त आहे. जसे पुणे, ठाणे, इ.

०८ Mandatroy schemes जसे :- CATP, Safety Zone regularization plan, relation plan इ. प्रकल्पासोबत जोडल्या जात नाही.

०९ केन्द्र शासन, सर्वोच्च न्यायालय नेहमी नविन सुचना काढीत असतात, यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

➔ त्यासाठी उपाययोजना काय आह.

०१ या कार्यालयात एक अधिपत्र काढल्या जाणार आहे, त्यात सर्व अद्यावत चेकलिस्ट आणि प्रमाणपत्राची सविस्तर नोंदी ठेवल्या जाणार आहे.

०२ प्रकल्प यंत्रणा व उपवनसंरक्षक यांनी प्रत्येकांना स्वतःची रोजनिशी (Diary of events) ठेवली पाहिजे, Repeated query लाल रंग दिला पाहिजे व त्यासाठी संबंधित असले पाहिजे.

***

Scanned by CamScanner

# २. वन (संवर्धन) अधिनियम, १९८०

## (१९८० चा अधिनियम क्रमांक ६९)

[दिनांक - २७ डिसेंबर, १९८०]

**वनांचे संवर्धन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या किंवा साहाय्यभूत असलेल्या किंवा तद्संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

तो भारतीय गणराज्याच्या एकतीसाव्या वर्षी, भारतीय संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :

**१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(१) या अधिनियमास, "वन (संवर्धन) अधिनियम, १९८०" असे म्हणावे;

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य सोडून संपूर्ण भारतास लागू होईल.

(३) तो, दिनांक २५ ऑक्टोबर, १९८० रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

### टिप्पणी

सर्वोच्च न्यायालयाने बिहार राज्य वि. बन्सी सम या प्रकरणात या अधिनियमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले आहे. या प्रकरणाच्या न्याय निर्णयाच्या परिच्छेद ८ मध्ये असे म्हटले आहे की,

अतिशय स्तुत्य उद्देश साध्य करण्यासाठी हा अधिनियम करण्यात आला असून, त्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे हे जनसामान्यांच्या हिताचे ठरेल. राखीव वनांच्या जागेत खाणकामाला परवानगी देण्याच्या संबंधातील प्रकरणांच्या बाबतीत जसा हा अधिनियम लागू होतो तसाच तो वनविषयक प्रयोजनांव्यतिरिक्त अन्य कारणासाठी वनांच्या जमिनींची मागणी केली जाते अशा सर्व प्रकरणांच्या बाबतीतही तो लागू होतो. **टी.एन. गोदावरमन वि. भारत सरकार (२००२) १० एस.सी.सी. ६०६.**

या प्रकरणात सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, वनांचा विनाश

१. १९८८ चा अधिनियम क्रमांक ६९ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केला (दि. १५.३.१९८९ रोजी व तेव्हापासून).

करणे हे घातक आहेच तसेच त्यामुळे पर्यावरणावरही विपरित परिणाम केला जातो व ते वनांच्या व मानवी जीविताच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. या गोष्टींना आळा घातलाच पाहिजे, तसेच अशा प्रकरणात वनांच्या जमिनींचा अन्य प्रयोजनासाठी वापर करण्याच्या बाबतीत विरोध झाला पाहिजे, तसेच त्यासाठी नुकसान भरपाईचीही तरतूद असली पाहिजे. या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने भारताचे वनविषयक धोरण १९८८ याबाबतही चर्चा केली आहे.

**२. वने बिन-राखीव करण्यावर किंवा वन जमिनींचा बिगर-वन प्रयोजनार्थ वापर करण्यावर निर्बंध.**

एखाद्या राज्यात त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतेही राज्य शासन किंवा अन्य प्राधिकरण, केंद्र सरकारची पूर्वमान्यता घेतल्याखेरीज,-

(एक) कोणतेही राखीव वन (त्या राज्यामध्ये त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील "राखीव वन" या शब्दप्रयोगाच्या अर्थांतर्गत असलेले) किंवा त्याचा कोणताही भाग, राखीव असण्याचे बंद करण्यात येईल असा;

(दोन) कोणतीही वन जमीन किंवा तिचा कोणताही भाग, बिगर-वन प्रयोजनार्थ वापरण्यात यावी असा;

[१][(तीन) कोणतीही वन जमीन किंवा तिचा कोणताही भाग, कोणत्याही खाजगी व्यक्तीला किंवा शासनाची मालकी, व्यवस्थापन किंवा नियंत्रण नसलेल्या कोणत्याही प्राधिकरणाला, महामंडळाला, एजन्सीला किंवा अन्य कोणत्याही संघटनेला भाडेपट्ट्याने किंवा अन्य प्रकारे अभिहस्तांकित करण्यात यावी असा;

(चार) कोणतीही वन जमीन किंवा तिचा कोणताही भाग, तिचा पुनर्वसन संवर्धनासाठी वापर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्या जमिनीवर किंवा तिच्या भागावर जी नैसर्गिकरीत्या वाढलेली आहेत अशी झाडे तोडून ती स्वच्छ करण्यात यावी असा;]

निर्देश देणारा कोणताही आदेश देणार नाही.

[१][**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनार्थ, "बिगर-वन प्रयोजन" याचा अर्थ कोणत्याही वन जमिनीचे किंवा त्याच्या भागाचे,-

(क) चहा, कॉफी, मसाले, रबर, पाम, तेल असणारी वनस्पती, फळबागायत वनस्पती किंवा औषधी वनस्पती;

(ख) पुनर्वसनसंवर्धनाच्या प्रयोजनाखेरीज कोणत्याही प्रयोजनार्थ, खंड पाडणे किंवा झाडे तोडून जमीन स्वच्छ करणे, असा आहे, परंतु यात वनांचे व वन्य प्राण्यांचे संवर्धन, विकास व व्यवस्थापन याच्याशी संबंधित किंवा साहाय्यभूत असलेल्या कोणत्याही कामांचा समावेश होणार नाही, जसे- तपासणी चौक्या (चेक-पोस्ट), अग्निशामक तारा, बिनतारी संदेशवहन यंत्रणा स्थापन करण्यासाठी आणि कुंपण, पूल व मोऱ्या, धरणे, जलछिद्रे, ट्रेंच मार्क (खंदक चिन्हे), सीमा चिन्हे, पाईपलाईन्स किंवा इतर तत्सम प्रयोजने.]

**[१][२क. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे अपील करणे.**

कोणतीही पीडित व्यक्ती, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्यावेळी किंवा त्यानंतर कलम २ अन्वये करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे किंवा निर्णयाद्वारे या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण अधिनियम, २०१० याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करू शकेल.]

**३. सल्लागार समितीची रचना.**

केंद्र सरकार,-

(एक) कलम २ अन्वये आवश्यक असलेली मान्यता देण्यासंबंधी; आणि

(दोन) केंद्र सरकारद्वारे तिच्याकडे निर्दिष्ट करण्यात येतील अशा वन संवर्धनाशी संबंधित असलेल्या अन्य कोणत्याही प्रकरणासंबंधी,

शासनाला सल्ला देण्यासाठी, त्याला योग्य वाटतील अशा संख्येतील व्यक्तींचा समावेश असणारी एक समिती घटित करू शकेल.

**[२][३क. या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.**

जी कोणतीही व्यक्ती, कलम २ च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील किंवा उल्लंघन करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, पंधरा दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या साध्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

**३ख. प्राधिकरणांनी व शासकीय विभागांनी केलेले अपराध.**

(१) जेव्हा या अधिनियमाखालील कोणताही अपराध,-

१. १९८८ चा अधिनियम क्रमांक ६९ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केला (दि. १५.३.१९८९ रोजी व तेव्हापासून).

२. १९८८ चा अधिनियम क्रमांक ६९ याच्या कलम २ द्वारे दाखल केला.

१. २०१० चा अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ३६, अनुसूची तीन, भाग तीन द्वारे समाविष्ट केले.

२. १९८८ चा अधिनियम क्रमांक ६९ याच्या कलम ३ द्वारे कलम ३-क व ३-ख दाखल केले (दि. १५.३.१९८९ रोजी व तेव्हापासून).

Scanned by CamScanner

(क) शासनाच्या कोणत्याही विभागाने केला असेल तर, विभाग प्रमुख; किंवा

(ख) कोणत्याही प्राधिकरणाने केला असेल तर, जी व्यक्ती, अपराध घडतेवेळी, प्राधिकरणाचा कारभार चालविताना तसेच प्राधिकरण चालविताना प्रत्यक्षपणे प्राधिकरणाची प्रभारी होती किंवा चालविण्यास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध खटला भरण्यास व तद्नुसार शिक्षेस पात्र असेल :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, विभाग प्रमुखास किंवा खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जर त्याने असा अपराध आपल्या नकळत घडला होता असे किंवा असा अपराध घडू नये यासाठी आपण सर्व यथायोग्य कार्यक्षमतेचा वापर केला होता हे सिद्ध केले असेल तर, कोणतीही शास्ती लादण्यास लागू असणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध शासनाच्या विभागे किंवा पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्राधिकरणाने केला असेल आणि असा अपराध, विभाग प्रमुखाखेरीज कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकरणाच्या बाबतीत, पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीखेरीज कोणत्याही व्यक्तीच्या संमतीने किंवा तिने कानाडोळा केल्यामुळे किंवा तिच्याकडून झालेल्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असेल त्याबाबतीत, असा अधिकारी किंवा व्यक्ती देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याच्या मानण्यात येतील आणि त्यांच्या विरुद्ध खटला भरण्यास व तद्नुसार शिक्षेस पात्र असतील.]

## ४. नियम करण्याचा अधिकार.

(१) केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम तयार करू शकेल.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो ठेवण्यात येईल त्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा उपरोक्त अधिवेशनाच्या लागोपाठचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे एकमत होतील किंवा असे नियम करण्यात येऊ नयेत याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर, असा नियम, त्यानंतर अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही

Scanned by CamScanner

फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**५. निरसन व व्यावृत्ती.**

(१) वन (संवर्धन) अध्यादेश, १९८० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसित करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाच्या तरतुदींन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

□□□

Scanned by CamScanner